मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# इंद्रायणी नदी पुन्हा एकदा फेसाळली!

## इंद्रायणी नदीत रसायनयुक्त पाणी : तीन दिवसांपासून नदीतील पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग

**पिंपरी | प्रतिनिधी**

रसायनयुक्त पाणी इंद्रायणी नदीत सोडले जात असल्याने पुन्हा एकदा पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग (फेस) आला आहे. मागील सलग तीन दिवसांपासून नदीतील पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग येत आहे. दरम्यान, इंद्रायणी नदीत रसायनयुक्त पाणी सोडणाऱ्या जाधववाडीतील एका भंगार व्यावसायिकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



इंद्रायणी नदीचा उगम हा लोणावळा परिसरातून झाला. ही नदी अनेक गावे, शहर पार करत आळंदीतून पुढे वाहत जाते. इंद्रायणी नदीचे १९ किलोमीटर पात्र पिंपरी-चिंचवड शहरातून वाहते. शहरातील औद्योगिक वसाहती, इंद्रायणी नदीकाठच्या कारखान्यातील रसायनयुक्त पाणी, गावांमधील मैलायुक्त पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी नदी पात्रात सोडले जाते. मैलायुक्त पाणी हे इंद्रायणी नदीला प्रदूषित करत आहे.

इंद्रायणी नदी पात्रात लाखो वारकरी मोठ्या श्रद्धेने स्नान करून माऊलींचे दर्शन घेतात. परंतु, नदीची अवस्था बघता लाखो वारकऱ्यांचे आणि आळंदीतील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आधीच जलपर्णीने इंद्रायणीचा श्वास गुदमरत आहे. आता त्यात जलप्रदूषणाची भर पडली असून अवघ्या नदीपात्रात तवंग दिसत आहे. रसायनयुक्त पाणी सोडल्यानेच नदीची अशी अवस्था झाल्याचे बोलले जात आहे. गेल्या तीन दिवसांपासून आळंदी येथील पाण्यावर पुन्हा तवंग येत आहेत.

नदी पात्रात राडारोडा टाकणारे, रसायन मिश्रित पाणी सोडणारे यांच्यावर आरोग्य विभागाचे लक्ष आहे. नदी पात्रात पाणी सोडणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई सुरू केली असल्याचे पर्यावरण विभागाचे कार्यकारी अभियंता हरविंदरसिंग बन्सल यांनी सांगितले.

### भंगार व्यावसायिकावर गुन्हा

» रसायनयुक्त पाणी इंद्रायणी नदीत सोडून नदी प्रदूषण केल्याने जाधववाडीतील भंगार व्यावसायिक रेहान एंटरप्रायजेसचे मालक अब्दुलमलीक अब्दुलजब्बार खान याच्या विरोधात चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी खान याचे कुदळवाडी परिसरात भंगारचे गोदाम आहे. त्याच्या गोदामातून रसायनयुक्त हिरवे लाल रंगाचे सांडपाणी इंद्रायणी नदीत मिसळत असल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत महापालिकेकडून पाहणी करून खातरजमा करण्यात आली. भंगार गोदाम लाखबंद (सील) करण्यात आले.

# चिखली-मोशीतील गृहनिर्माण सोसायट्यांत 'पाणीबाणी'

## टँकरची बिले भरुन सोसायटीधारक हैराण : टँकरशिवाय सोसायट्यांना पर्याय नाही

**पिंपरी | मनीषा थोरात-पिसाळ**

फ्लॅटसाठी लाखो रूपयांचे कर्ज काढून, दागिने मोडून आयुष्याची जमापुंजी लावली. शहरात स्वतःचे हक्काचे घर मिळाले म्हणून आनंदात रहायला आलो. मात्र पाणी समस्यांनी हैराण झाले असून, लाखो रूपये सोसायटीला टँकरवर खर्च करावे लागत आहेत. अशा व्यथा सोसायटीतील सदस्यांनी मांडल्या आहेत. महापालिकेला हजारो रुपये पाणीपट्टी भरुनही पुरेसे पाणी मिळत नसल्यामुळे स्थानिक शेतकरी व जागामालकांकडून बोअरवेलचे किंवा टँकरचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात. ही परिस्थिती चिखली-मोशी परिसरातील बहुतेक गृहनिर्माण सोसायट्यांमधील आहे.

चिखली-मोशीदरम्यान देहू-आळंदी रस्ता आणि इंद्रायणी नदी या पट्ट्यात अनेक गृहनिर्माण प्रकल्प साकारले आहेत. त्यांच्यासाठी महापालिकेने जलवाहिन्या टाकल्या आहेत. नळजोड दिलेले आहेत. मात्र पुरेसे पाणी मिळत नसल्याने सोसायट्यांना पाणी विकत घ्यावे लागत आहे. साईहिरा क्लासिक सोसायटी, गंधर्व एक्सलंन्स, रिव्हर रेसीडेन्सी, अंजनीगाथा, स्वास्तिक स्टिरा, ब्लू डायस, व्हिस्टेरीया, डिस्ट्रीक मेमोर अशा चिखली मोशीतील सोसायट्यांना लाखो रूपये पाण्याच्या टँकरसाठी खर्च करावे लागत आहेत.



"पाण्याच्या समस्यांनी हैराण झालो आहेत. टँकरचे दर वाढलेले आहेत. टँकर लॉबी ठरलेल्या आहेत. सोसायटीधारकांना प्रत्येक एका टँकरमागे नऊशे ते एक हजार रूपये मोजावे लागतात. चिखली आणि मोशीमध्ये शंभर ते दोनशे रूपये पर टँकर फरक आहे. टँकरचे बिले भरावी की, सोसायटी मेन्टेन ठेवावी हा प्रश्न सोसायटीधारकांसमोर आहे.

- संदीप बोरसे, अंजनीगाथा सोसायटी.

"महापालिकेला सर्व सेवा सुविधांसाठी टॅक्स भरतो. तरीही पाणी, वीज या मूलभुत सुविधांसाठी नागरिकांना झगडावे लागत आहे. अधिकाऱ्यांनाही पाणी, लाईट समस्यांसाठी फोन करून वैतागलो. एक समस्या संपली की दुसरी समोर उभी आहेच. वाहतूक कोंडीही हा पण ज्वलंत विषय आहे. मात्र सध्या सोसायटीतील नागरिकांना पाण्यासाठी झगडावे लागत आहे. लाखो रूपये पाण्यावर सोसायट्या करत आहेत.

- विकास साने, सामाजिक कार्यकर्ते.

"रिव्हर रेसीडेन्सी सोसायटीमध्ये १७ इमारती असून, १३२७ सदनिका आहेत. सध्याच्या स्थितीला दररोज सुमारे तीस ते चाळीस टँकर सोसायटीसाठी मागवावे लागतात. पाण्यासाठी सोसायटीला लाखो रुपये खर्च करावे लागतात. सोसायटीतील सदस्य टँकर चे बिले भरून हैराण झाले आहेत. प्रत्येकाला घराचे हफ्ते भरावे लागतात. आलेल्या पगारामधून अनेकजन काटकसर करून जीवन जगतात, त्यात पाण्यामुळे प्रत्येकाच्या खिशाला कात्री बसते आहे.

- प्रकाश जुंकटवार, रिव्हर सोसायटी

# जाहिरात फलकांची छाया जीवघेणी

## पुणे शहरात फक्त 85 अनधिकृत जाहिरात फलक : हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सर्वाधिक फलक



**पुणे | प्रतिनिधी**

शहरात बेकायदा जाहिरात फलकांचे (होर्डिंग) पेव फुटले असताना महापालिकेच्या आकडेवारीनुसार शहरात फक्त ८५ अनधिकृत जाहिरात फलक असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सर्वाधिक ८४, तर औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत एक अनधिकृत जाहिरात फलक आहे. तसेच दोन हजार ५९८ अधिकृत जाहिरात फलकांपैकी दोन हजार २४९ जाहिरात फलकांचे स्थापत्य लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्यात आले आहे. व्यावसायिक जाहिरात फलक परवानगी घेऊनच उभारण्यात आले असून, तात्पुरत्या स्वरूपातील फलकांची उभारणी करताना परवानगी घेतली जात नसल्याचा दावाही प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

मुंबई येथील घाटकोपर येथे जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी मंगळवारी तातडीने आढावा बैठक घेतली. त्यानंतर सर्व अधिकृत जाहिरात फलकांचे स्थापत्य लेखापरीक्षण अहवाल करून घेण्याची, तसेच अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करून त्याबाबतचा अहवाल दोन दिवसांत देण्याची सूचना डॉ. भोसले यांनी परवाना आणि आकाशचिन्ह विभागाच्या अधिकाऱ्यांना केली. या बैठकीत केवळ ८५ जाहिरात फलक अनधिकृत असल्याची माहिती आकडेवारीसह आयुक्तांना देण्यात आली.

शहरातील प्रत्येक चौकात, गल्लीबोळात, रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर विनापरवाना जाहिरात फलकांची उभारणी करण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांचा मुद्दा सातत्याने ऐरणीवर आला होता. या पार्श्वभूमीवर शहरातील अधिकृत आणि अनधिकृत जाहिरात फलकांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय महापालिकेच्या परवाना आणि आकाशचिन्ह विभागाकडून घेण्यात आला होता. त्यानुसार शहरात दोन हजार ५९८ अधिकृत जाहिरात फलक असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

जाहिरात फलक उभारताना आकाशचिन्ह आणि परवाना विभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र, परवानगी न घेता जाहिरात फलक उभारले जात आहेत. तथापि हे सर्व जाहिरात फलक तात्पुरत्या स्वरूपाचे आहेत. व्यावसायिक जाहिरात फलक परवानगी घेऊन उभारण्यात आले असून, त्यांचा आकारही परवानगीनुसारच आहे, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

दरम्यान, महापालिका प्रशासनाकडून अनधिकृत जाहिरात फलकांवर वेळोवेळी कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार ही कारवाई कायम ठेवण्यात येईल. पावसाळ्यात किंवा सध्याच्या अवकाळी पावसात जाहिरात फलक कोसळून दुर्घटना होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, असे परवाना आणि आकाशचिन्ह विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी सांगितले.

### कारवाईची मागणी

घाटकोपर येथील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर पुण्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी महापालिकेने ठोस उपाययोजना कराव्यात आणि धोकादायक जाहिरात फलक तातडीने हटवावेत, अशी मागणी कसबा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी केली आहे. त्याबाबतचे निवेदन धंगेकर यांनी आयुक्त डॉ. भोसले यांना दिले आहे.

### नगर रस्ता परिसरात सर्वाधिक अधिकृत फलक


» नगर रस्ता क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ४९१ अधिकृत जाहिरात फलक आहेत. त्या खालोखाल औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील सर्वाधिक ३७६ अधिकृत जाहिरात फलक आहेत. विशेष म्हणजे या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत अवघा एक जाहिरात फलक अनधिकृत असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत २६६ अधिकृत जाहिरात फलक असून, येथे ८४ अनधिकृत जाहिरात फलक आहेत.

“ शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करण्याचे आणि दोन दिवसांत अहवाल देण्याची सूचना परवाना आणि आकाशचिन्ह विभागाच्या अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे. शहरात केवळ ८५ जाहिरात फलक अनधिकृत आहेत. अधिकृत जाहिरात फलक धोकादायक नाहीत.

- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.

# रेल्वेचा विनापरवाना फेरीवाल्यांवर दंडुका!

## रेल्वे गाड्या आणि स्थानकांमध्ये अनधिकृत फेरीवाले : खाद्यपदार्थ अन् पाण्याच्या बाटल्यांच्या विक्रीवरही नजर



**पुणे | प्रतिनिधी**

रेल्वे गाड्या आणि स्थानकांमध्ये अनधिकृत फेरीवाले मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. या अनधिकृत फेरीवाल्यांकडून प्रामुख्याने खाद्यपदार्थांची विक्री केली जात आहे. हे खाद्यपदार्थ चांगल्या दर्जाचे नसल्यामुळे प्रवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे आता रेल्वे सुरक्षा दलासह वाणिज्य विभागाने अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई सुरू केली आहे. यामध्ये ५६० फेरीवाल्यांना पकडून त्यांच्याकडून तीन लाखांहून अधिक दंड वसूल करण्यात आला आहे.

मध्य रेल्वेमध्ये रेल्वे सुरक्षा दल आणि रेल्वेच्या वाणिज्य विभागाने गाड्या, स्थानके आणि फलाटावर अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध कारवाईची मोहीम राबवली. त्यात पुणे, दौंड, मिरज, सातारा, अहमदनगर, कोपरगाव, बेलापूर या प्रमुख स्थानकांवर कारवाई करण्यात आली. विनापरवाना खाद्यपदार्थ, बाटलीबंद पाणी विकणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाईचा दंडुका उगारण्यात आला.

या मोहिमेमध्ये २७ एप्रिल ते १२ मे या कालावधीत ५६० फेरीवाल्यांना पकडण्यात आले. त्यातील ३५१ फेरीवाल्यांवर न्यायालयात खटला दाखल करून त्यांच्याकडून तीन लाख १७ हजार ४२५ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच फेरीवाल्यांकडून एक हजार ९४५ पाण्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. याशिवाय रेल्वेच्या अधिकृत स्टॉलवर खाद्यपदार्थ आणि पाण्याच्या बाटल्यांची जास्त किमतीने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांकडून ६० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

### वस्तूंची जास्त दराने विक्री

» पुणे रेल्वे स्थानक परिसरात अनेक विक्रेते छापील कमाल किमतीऐवजी जास्त पैसे प्रवाशांकडून उकळत आहेत. त्याचबरोबर अनधिकृत कंपन्यांच्या उत्पादनांची विक्री केली जात असल्याच्या तक्रारी अनेक प्रवाशांनी केल्या आहेत. पाण्याच्या बाटलीची विक्रीही जादा दराने केली जात असल्याचे अनेक प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे प्रवाशांची लूट करणारे विक्रेते आणि फेरीवाले यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# मावळमध्ये घटलेल्या मताचा कोणाला फटका

## खासदार श्रीरंग बारणे आणि महाविकास आघाडीचे संजोग वाघेरे यांच्यासह 33 उमेदवार निवडून रिंगणात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे आणि रायगड जिल्ह्यात विभागलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात यंदा दोन्ही शिवसेनेत चुरशीची लढत झाली. पण, मतदानात चुरस दिसून आली नाही. मागीलवेळीपेक्षा पाच टक्क्यांनी मतदानात घट झाली आहे. घटलेल्या मताचा कोणाला फटका बसणार याचे आखाडे बांधण्यास सुरुवात झाली आहे. मावळमध्ये ५५.८७ टक्के मतदान झाले असून घाटाखालील उरण, कर्जत विधानसभा मतदारसंघात, सर्वाधिक तर पनवेलमध्ये सर्वात कमी मतदान झाले.

महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यासह ३३ उमेदवार निवडून रिंगणात आहेत. मात्र, खरी लढत बारणे आणि वाघेरे यांच्यातच झाली. मावळमध्ये पनवेल, कर्जत, उरण, मावळ, चिंचवड आणि पिंपरी विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. २५ लाख ८५ हजार १८ मतदारांपैकी केवळ १४ लाख १८ हजार ४३९ मतदारांनीच मतदानाचा हक्क बजाविला. त्यात सात लाख ७७ हजार ७४२ पुरुष तर सहा लाख ४० हजार ६५१ महिला आणि इतर ४६ जणांनी मतदान केले.

राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके यांच्या मावळ विधानसभा मतदारसंघातील ३ लाख ७३ हजार ४०८ पैकी २ लाख ६,९४९ लोकांनी मतदान केले. दोन्ही उमेदवारांना मतदान झाल्याचे दिसून आले.

सर्वाधिक मतदारसंख्या असलेल्या चिंचवडमध्ये ५२.२० टक्के मतदान झाले. ६ लाख १८ हजार २४५ पैकी ३ लाख २२ हजार ७०० जणांनी मतदान केले. जगताप कुटुंबीयांचे वर्चस्व असलेल्या चिंचवड मतदारसंघात कमी मतदान झाल्याने चर्चेचा विषय ठरला आहे.



### पनवेलमध्ये सर्वात कमी मतदान

» कर्जतमध्ये महायुती भक्कम होती. शिवसेनेचे आमदार महेंद्र थोरवे, भाजपमध्ये असलेले राष्ट्रवादीचे माजी आमदार सुरेश लाड यांनी जोर लावल्याचे दिसले. पनवेलमधील ५ लाख ९१ हजार ३९८ पैकी २ लाख ९५ हजार ९७३ (५०.०५ टक्के) मतदारांनी मतदान केले. पनवेलमध्ये सर्वात कमी मतदान झाले असून भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. शहरी भाग असल्याने बारणे यांना मताधिक्य मिळू शकेल, असे बोलले जात आहे.

### उरण विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक मतदान

» उरण विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक मतदान झाले आहे. ३ लाख १९ हजार ३११ मतदारांपैकी दोन लाख १४ हजार १६९ मतदारांनी (६७.०७ टक्के) मतदान केले. उरणमध्ये भाजपचे सहयोगी अपक्ष आमदार महेश बालदी आणि ठाकरे गटाचे माजी आमदार मनोहर भोईर यांनी जोर लावल्याचे दिसून आले. उरणमधून महाविकास आघाडीचे उमेदवार वाघेरे यांच्या पारड्यात जास्त मते पडतील असा अंदाज लावला जात आहे. त्याखालोखाल कर्जत विधानसभा मतदारसंघात ६१.४० टक्के मतदान झाले. ३ लाख ९ हजार २०८ पैकी १ लाख ८९ हजार ८५३ जणांनी मतदान केले. कर्जत, खालापूर, खोपोली परिसरात दुपारी अवकाळी पाऊस झाला. त्याचा मतदानावर परिणाम झाल्याचे दिसून आले.

# मावळ मतदारसंघातील मतदान यंत्रे स्ट्राँगरुम सील

## ईव्हीएम यंत्रे तसेच टपाली मतपेट्या : मतमोजणीपर्यंत पोलिसांचा चोवीस तास सशस्त्र पहारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडली असून मतदानासाठी वापरलेली ईव्हीएम यंत्रे तसेच टपाली मतपेट्या आज बालेवाडी पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग हॉलमध्ये तयार करण्यात आलेल्या स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आल्या असून कडेकोट बंदोबस्त असणारी ही स्ट्राँगरूम आज सील करण्यात आली.

मावळ लोकसभा निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेले निवडणूक निरीक्षक बुदिती राजशेखर, निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, सीआरपीएफचे सुभेदार दुर्गेश कुमार मीना तसेच मावळ लोकसभा निवडणुकीतील उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली.

मावळ लोकसभा मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडली असून 4 जून 2024 रोजी बालेवाडी पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग हॉलमध्ये मतमोजणी पार पडणार आहे.

मतदानासाठी वापरलेली ईव्हीएम यंत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथील वेटलिफ्टिंग हॉलच्या ठिकाणी भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून सुरक्षा कक्ष (स्ट्राँग रूम) तयार करण्यात आला असून त्यामध्ये ईव्हीएम यंत्रे ठेवण्यात आली आहेत. या कक्षाला केंद्रीय सुरक्षा दलासह महाराष्ट्र पोलिस दलाचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शिवाय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सीसीटीव्ही यंत्रणेसह आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात आली आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघाकरीता 1632 बॅलेट युनिट, 544 कंट्रोल युनिट आणि 548 व्हीव्हीपॅट यंत्रे, कर्जत विधानसभा मतदारसंघासाठी 1017 बॅलेट युनिट, 339 कंट्रोल युनिट आणि 345 व्हीव्हीपॅट यंत्रे, उरण विधानसभा मतदारसंघासाठी 1032 बॅलेट युनिट,

344 कंट्रोल युनिट आणि 346 व्हीव्हीपॅट यंत्रे, मावळ विधानसभा मतदारसंघासाठी 1170 बॅलेट युनिट, 390 कंट्रोल युनिट आणि 396 व्हीव्हीपॅट यंत्रे, चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी 1647 बॅलेट युनिट, 549 कंट्रोल युनिट आणि 556 व्हीव्हीपॅट यंत्रे, पिंपरी विधानसभा मतदारसंघासाठी 1200 बॅलेट युनिट, 400 कंट्रोल युनिट आणि 402 व्हीव्हीपॅट यंत्रे असे एकूण 7698 बॅलेट युनिट, 2566 कंट्रोल युनिट आणि 2593 व्हीव्हीपॅट यंत्रे वापरण्यात आली आहेत.



### कडेकोट पोलीस बंदोबस्तात वाहतूक

» मावळ लोकसभेसाठी मतदान प्रक्रिया पार पाडल्यानंतर या अंतर्गत येणाऱ्या पनवेल, मावळ, उरण, कर्जत, पिंपरी आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघनिहाय निश्चित केलेल्या ठिकाणी मतदान साहित्य जमा करण्यात आले. त्या ठिकाणाहून कंटेनरमध्ये मतदानासाठी वापरलेले ईव्हीएम यंत्रे आणि मतमोजणीसाठी आवश्यक इतर मतदान साहित्य कडेकोट पोलीस बंदोबस्तात रात्री उशिरापर्यंत बालेवाडी येथे आणण्यात आले. त्यानंतर मतदान यंत्रांसह सर्व साहित्य स्ट्राँग रूममध्ये ठेऊन ही रूम सील करण्यात आली.

# विजयासाठी साडेपाच लाख मतांची गरज

## पुण्यात झाले 11 लाखांवर मतदान : मुरलीधर मोहोळ, रवींद्र धंगेकर लढत चुरशीची

**पुणे | प्रतिनिधी**

गेली दहा वर्षे भाजपच्या ताब्यात असलेल्या पुणे लोकसभा मतदारसंघात यंदा चुरशीची लढत झाली आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडी, महायुती, वंचित बहुजन आघाडी तसेच एमआयएमकडूनही उमेदवार उभे करण्यात आले होते.

पुण्यात यावेळी महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ आणि महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या सरळ सामना असणार आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातील अंतिम आकडेवारीनुसार, पुण्यात ११ लाख ३ हजार ६७८ मतदान झाले आहे. यात विजयासाठी उमेदवारास सुमारे साडेपाच लाख मतांची गरज असणार आहे.

२०१९ मध्ये पुणे लोकसभा मतदारसंघात १० लाख ३४ हजार १५४ मतदान झाले होते. त्यामुळे गेल्या निवडणूकीच्या तुलनेत यंदा ६९ हजार ५२४ जादा मतदान झाले असून या मतदानाचा फायदा नेमका कोणाला होणार, याबाबत राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मागील निवडणुकीत भाजपचे गिरीश बापट यांना ६ लाख ३२ हजार ८३५ मते मिळाली होती. ते ३ लाख २५ हजार मतांनी विजयी झाले होते.

कसबा विधानसभा मतदारसंघात २०१९ मध्ये १ लाख ६१ हजार १५१ मतदान झाले होते. या वर्षी हे मतदान १ लाख ६४ हजार १०५ झाले आहे. तर पर्वती मतदान संघात २०१९ मध्ये १ लाख ८३ हजार ३१० मतदान झाले होते. या निवडणूकीत ते १ लाख ८९ हजार १८४ झाला आहे.

२०१९ मध्ये कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघात १ लाख ४० हजार ३६४ मतदान झाले होते. यात वाढ होत या निवडणूकीत १ लाख ४९ हजार ९८४ मतदान झाले आहे. तर शिवाजीनगर मतदानसंघात मतदान घटले असून २०१९ मध्ये १ लाख ४२ हजार २९९ मतदान झाले होते. ते या निवडूकीत १ लाख ४१ हजार १३३ झाले. पुणे लोकसभा मतदारसंघात 20 लाख 61 हजार 276 मतदारांपैकी 11 लाख 3 हजार 678 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. लोकसभा मतदारसंघात सरासरी 53.54 टक्के मतदान झाले. 2019 च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदा मतदानामध्ये 3.4 टक्के म्हणजे जवळपास 69 हजार 524 मतदान वाढले आहे.



### भाजपला होते सहाही मतदारसंघांत मताधिक्य

» मागील निवडणुकीत गिरीश बापट यांना सर्वच सहा विधानसभा मतदारसंघांत मताधिक्य मिळाले होते. मात्र, मागील वर्षी कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपला पराभवाचा धक्का सहन करावा लागला. त्यामुळे कॉंग्रेसने यावेळी सर्वच मतदारसंघांत ताकद लावली असून, निवडणुकीत चुरस आणली आहे. २०१९ मध्ये वडगावशेरी विधानसभा मतदारसंघात २ लाख ६ हजार १६९ मतदान झाले होते. २०१४ मध्ये हे मतदान तब्बल ३५ हजारांनी वाढले असून या निवडणूकीत २ लाख ४१ हजार ८१७ मतदान झाले आहे. कोथरूड विधानसभा मतदारसंघात २०१९ मध्ये २ लाख ५२६ मतदान झाले होते, या निवडणूकीत हा आकडा २ लाख१७ हजार ४५५ झाला आहे.

### पाच मतदारसंघात वाढले मतदान

» लोकसभेच्या अंतिम आकडेवारीनुसार, २०१९ च्या तुलनेत शहरातील कसबा, कोथरूड, कॅन्टोन्मेंट,पर्वती आणि वडगावशेरी विधानसभा मतदारसंघात मतदान वाढले आहे. हे मतदान कोणत्या उमेदवाराला विजयाच्या दारात घेऊन जाणार याबाबत उत्सूकता निर्माण झाली आहे. या सहा विधानसभा मतदासंघापैकी कसबा मतदारसंघात स्वत: रवींद्र धंगेकर हे आमदार असून उर्वरीत ४ मतदारसंघात भाजपचे आमदार आहेत तर वडगावशेरीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचा आमदार असून ते महायुतीत आहे.

# एक तास सीसीटीव्ही बंद असणे गंभीर

## निवडणूक आयोगाने त्यांच्या यंत्रणेने अधिकची काळजी घेतली पाहिजे होती : युगेंद्र पवार

**पुणे | प्रतिनिधी**

स्ट्रॉंग रूममधील सीसीटीव्ही काही काळ बंद ही खूप गंभीर गोष्ट आहे. अगोदरच ईव्हीएमबाबत लोक शंका करीत आहेत. याबाबत निवडणूक आयोगाने आणि त्यांच्या यंत्रणेने अधिकची काळजी घेतली पाहिजे होती. एक तास सीसीटीव्ही कॅमेरे बंद असणे, हे खूप गंभीर व चुकीचे आहे. अशी प्रतिक्रिया युगेंद्र पवार यांनी दिली.

बारामती लोकसभा मतदारसंघाचे मतदान पार पाडल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार यांनी शरदचंद्र पवार पक्ष कार्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. शेकडो नागरिकांनी युगेंद्र पवार यांची भेट घेत निवेदने सादर केली. दरम्यान, त्यांनी पत्रकारांची संवाद साधला.



बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत ईव्हीएम मशीन ज्या स्ट्रॉंग रूममध्ये ठेवल्या होत्या. तेथील सीसीटीव्ही काही काळ बंद असल्याची तक्रार शरद पवार गटाकडून केली होती. या प्रश्नावर युगेंद्र पवार यांनी स्पष्ट मांडले.

ते म्हणाले की, प्रचारादरम्यान नागरिकांनी आम्हाला ज्या समस्या सांगितल्या आहेत. त्या सोडवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचे ऍडमिशन, नोकरी संदर्भातील कामे करण्याचा आमचा प्रयत्न आहे. वैद्यकीय मदत कक्ष चांगल्या प्रकारे काम करीत आहे. मदत कक्ष सुरू केल्यापासून २० लाखांपर्यंतची आतापर्यंत मदत केली आहे.

नागरिकांच्या ज्या काही वैद्यकीय समस्या असतील त्या सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. निवडणुकीनंतर माझ्या कुटुंबातील सदस्य परदेशी दौऱ्यावर जातील. अशी टीका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली होती. याबाबत विचारले असता युगेंद्र पवार म्हणाले की, मी बारामतीतच आहे. आणि इतरांनाही कुणाला परदेशात जायचं असेल तर.. त्यात गैर आणि चुकीचं काही नाही. अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

### जर अन् तर... मौन

» राजकारणात उतरणार का, असा प्रश्न केला असता ते म्हणाले की, आपण अनेकदा हा प्रश्न केला आहे. मीही अनेकदा नाही असं सांगितलं आहे. जर शरद पवार यांचे संकेत आले तर.. आपण राजकारणात याल का असा प्रश्न केला असता त्यांनी उत्तर देण्याचे टाळले.